# निवडणुक प्रचार अभियान डायरी- दि.30.04.2014

**-अरुण जेटली**

**(विरोधी पक्षनेते, राज्यसभा)**

अमृतसरमध्ये आज मतदान आहे. या कडक उन्हाळ्यात निवडणुक प्रचारासाठी अमृतसर मध्ये सहा आठवडे व्यतित केल्यानंतर, आता वेळ आहे दुस-या राज्यांकडे पाहण्याची जिथे निवडणुका अजून होणे बाकी आहेत. अमृतसर मध्ये स्वादिष्ट भोजनावर ताव मारणे माझ्या प्रवासाचा महत्त्वपूर्ण हिस्सा होता. मी अमृतसरला नेहमी भारताचे फूड कॅपीटल मानत आलो आहे.

अमृतसरचे कुलचे आणि चण्याने आपली राष्ट्रीय छाप सोडली आहे. भारताच्या अधिकतर भागात प्रत्येक कॅटररच्या व्यंजनांच्या सूचीत अमृतसरी ढाब्याचे विशेष महत्त्व आहे. अमृतसरमध्ये कुलच्या सोबत चणे आणि कांद्याची चटणी दिली जाते जी शहराच्या प्रत्येक भोजनालयात उपलब्ध असते. लोक नाश्त्याला, दुपारच्या भोजनात तसेच रात्रीच्या भोजनात कुलचे खाणे पसंत करतात.

अमृतसर मध्ये नाश्त्यामध्ये आजही भरवा पराठे किंवा पूरी छोले खाल्ले जातात. शहराच्या परंपरेनुसार आज ही लोक घरात शिजवण्याच्या बदल्यात प्रसिद्ध हलवाईंकडून पूरी छोले मागवणे पसंत करतात. जुन्या शहरातील अधिकांश भागात त्यांचे आपले खास हलवाई आहेत. मात्र शहरात सर्वात प्रसिद्ध लॉरेंस रोड स्थित कन्हैया आहे. चण्यात कडी तयार करण्यासाठी बटाटा घातला जातो. नाश्त्याची खुप स्तुती होते मात्र यात जास्त कॅलरी असल्याकारणाने याला कधी-कधीच खाल्ले जाते. अधिकतर हलवाईवाल्यांकडे अमृतसरी लस्सी मिळते. मात्र 'आहूजा' आणि 'ज्ञान' खुप प्रतिष्ठित आहेत. दोघे ही झोप न येण्यावर उपचार देतात. शाकाहारी भोजनासाठी 'केसर' चा दबदबा आजही कायम आहे. हे शहरातील सर्वात प्रसिद्ध ढाब्यांपैकी एक आहे."भरवां" च्या नावाने ढाब्यांची श्रृंखला "भरवां" अथवा "ब्रदर्स" मध्ये शाकाहारी भोजनाची मजा घेण्यासाठी पर्यटक आणि स्थानीय लोकांची खुप गर्दी झालेली असते.

मांसाहारी भोजन खाणा-यांसाठी सुरजीत चे नाव घेणे खुप आहे. त्यांचे तंदुरी चिकन, अमृतसरी मच्छी आणि मटण चैम्प्स(ओल्ड इंग्लिश कटलेट प्रमाणे शिजविले जाते) चे नाव घेताच तोंडाला पाणी सुटते. 'मक्खन' मछली स्वादिष्ट भोजन पसंत करणा-यांसाठी आहे. मी आजपर्यंत ज्याचा आनंद घेतला नाही मात्र लोकांनी मला त्याची मजा घेण्यास सांगितले आहे ते आहे 'बीरा' ज्याला उच्च क्वालिटीचे चिकन बोलतात.

चहाचे दुकान 'ज्ञानी' मध्ये सकाळच्या चहाच्या वेळी पूर्ण शहरात सुरु असलेली चर्चा ऐकली जाते. हा माझ्या साठी लोधी गार्डन च्या चहाचा पर्याय होता.

मला वाटते की या जबरदस्त जागांना देशभरात ब्रांड मूल्य मिळेल.